अति. महापालिका आयुक्त (वि.) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा. क्र. अतिमआवि/सविवि/२६६८
दि. ०८/०९/२०२०

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय :– हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. व श्री सद्गुरू शंकर महाराज महिला उन्नती संस्था, दिप किरण ग्राहक सहकारी संस्था, पुणे या चार संस्थांना शासन निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन क्षेत्रिय कार्यालयास र. रू. ३ लाखापर्यत लागणाऱ्या सेवा व वस्तू घेण्यासाठी काम विना निविदा देणेबाबत.**

संदर्भ :– मा. स्थायी समिती ठराव क्र. २८७४ दि. ८/०३/२०१९

हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. व श्री सद्गुरू शंकर महाराज महिला उन्नती संस्था, दिप किरण ग्राहक सहकारी संस्था, पुणे या चार संस्था सहकार तत्वावर चालविण्यात येणाऱ्या रजिस्टर्ड संस्था असून या संस्थामधून अनेक गोरगरीब महिला व गरजू लोकांना रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे या चार संस्थांना शासन निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन क्षेत्रिय कार्यालयास र. रू. ३ लाखापर्यत लागणाऱ्या सेवा व वस्तू घेण्यासाठी काम विना निविदा काढण्यास मा. स्थायी समिती ठराव क्र. २८७४ दि. ८/०३/२०१९ नुसार मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानुसार हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. व श्री सद्गुरू शंकर महाराज महिला उन्नती संस्था, दिप किरण ग्राहक सहकारी संस्था, पुणे यांना नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्र. बेस्वरो–१०/२००२/ प्र. क्र. १५०/नवि–२७ दिनांक २३/१०/२००२ व सन २०१५ नुसार रक्कम रूपये ३ लाखापर्यंतची पुणे महानगरपालिका क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत निघणारी विविध प्रकारची कामे विना निविदा देणेची कार्यवाही करावी.

अति. महापालिका आयुक्त (वि.)
पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अवलोकनार्थ व माहितीसाठी –**

१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
२) मा. अति. महापालिका आयुक्त (ज./इ./वि.), पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अंमलबजावणीसाठी –**

१. मा. महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय १ ते १५)
२. मा. सर्व खातेप्रमुख

(सुनिल इंदलकर)
**उप आयुक्त**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

**नगरसचिव कार्यालय**

पुणे महानगरपालिका

**स्थायी समितीचा ठराव**

दिनांक - ८/३/२०१९

सभा क्रमांक :- ७१

खाते :- मा.महा.आयुक्त

विषय क्रमांक :- २८७१ त्वर्य

ठराव क्रमांक :- २८७४

संदर्भ :- १) शासन निर्णय रोस्वरो-२००२/प्रक्र२६७/रोस्वरो १ , दि.१७/८/२००२

२) महापालिका आयुक्त जा.क्र मआ/नावियो/१२९८, दि. ४/२/२००३

३) मा. मुख्य सभा ठ.क्र. १७३, दिनांक २६/६/२००३

४) मा. प्रकाश ढोरे व मा. राजेंद्र शिळीमकर यांचे दिनांक ६/३/१९ चे पत्र.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, मर्या. विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या व श्री. सदगुरू शंकर महाराज माहिला उन्नती संस्था , दिप किरण ग्राहक सहकारी संस्था, पुणे या चार संस्था सहकार तत्वावर चालविण्यात येणाऱ्या रजिस्टर्ड संस्था असून या संस्थामधून अनेक गोरगरीब महिला व गरजू लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

त्यामुळे या चार संस्थांना शासन निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन क्षेत्रिय कार्यालयास र.रू. ३ लाखापर्यत लागणाऱ्या सेवा व वस्तु घेण्यासाठी काम विना निविदा काढण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.